# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८/०१/२०२२

### जिल्हा : जळगाव

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२८/०१/२०२२ ते ०१/०२/२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 29 | 30 | 31 | 1 | 2 |
| पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 27 | 29 | 30 | 29 | 28 |
| किमान तापमान (अं.से.) | 10 | 11 | 13 | 12 | 11 |
| ढग स्थिती (आकाश) | 0 | 0 | 1 | 0 | 0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 65 | 65 | 60 | 59 | 58 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 39 | 40 | 40 | 39 | 38 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 7 | 4 | 3 | 4 | 3 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 91 | 103 | 167 | 244 | 82 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्हयात दिनांक २८ जानेवारी, २०२२ ते ०१ फेब्रुवारी, २०२२ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०२ ते ०८ फेब्रुवारी, २०२२ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • सध्याच्या थंड हवामानात रब्बी पिकांना व फळ बागांना आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार रात्रीच्या वेळी पाणीपुरवठा करावा.<br>• मळणी व काढणी केलेल्या खरीप पिकाची व धान्याची उन्हात चांगले वाळवून सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| कापूस | वेचणी | वेचल्यानंतर कापूस ३ ते ४ दिवस उन्हात वाळवून स्वच्छ व कोरड्या जागेत साठवावा. गुलाबी बोंड |

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | अळीच्या नियंत्रणासाठी कापसाची वेचणी झालेल्या क्षेत्रामध्ये कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पर्ऱ्हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्यांचा कम्पोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा व खोल नांगरट करावी जेणेकरून किडींच्या अवस्था नष्ट होतील. पुढील हंगामात कापसावरील शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कापूस पिकाची वेचणी पुर्ण करावी व पिक काढून टाकावे तसेच खोडवा/फरदड किंवा दुबार पिक घेण्याचे पूर्णतः टाळावे. हंगामाबाहेर पिके घेतल्यास आर्थिक नुकसान होवून किडींना अखंड अन्न पुरवठा होतो व पुढील वर्षीच्या पिकावर किडींचा प्रादुर्भाव लवकर व जास्त प्रमाणात होतो. |
| हरभरा | घाटे भरण्याची ते पक्वता अवस्था | हरभरा पिकास तुषार सिंचन पद्धतीने योग्य प्रमाणात रात्रीच्या वेळी पाणी द्यावे. त्यामुळे उत्पादनात मोठी वाढ होते. सध्याच्या हवामानामुळे हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येताच ५ **%** निबोंळी अर्काची फवारणी करावी. हरभरा पिकावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी इंग्रजी **'T'** आकाराचे प्रति हेक्टरी ५० पक्षीथांबे उभारल्यास किड आटोक्यात ठेवण्यास मदत होते. किडीचे प्रमाण जास्त असल्यास त्याच्या रासायनिक नियंत्रणासाठी अझाडीरेक्टीन १५०० पी.पी.एम. ५० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ऊस | लागवड | सुरु ऊसाची लागवड करण्यासाठी शेत तयार करुन सुरु ऊसाची लागवड करावी. ऊस बेणे लागणीपूर्वी १०० लिटर पाणी + ३०० मि.ली.मेलॅथिऑन + १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम (बाविस्टीन) १० मिनीटांसाठी बेणे प्रक्रिया केल्यानंतर जिवाणू खतांची बीज प्रक्रिया करावी. यामुळे बुरशीजन्यरोग व खवले किडीचा बंदोबस्त होतो. ॲसेटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खतांचे प्रमाण अनुक्रमे १० किलो आणि १.२५ किलो प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून केलेल्या द्रावणात उसाच्या टिप-या ३० मिनीटे बुडवून लागण करावी. त्यामुळे नत्र खतामध्ये ५० टक्के तर स्फुरद खतामध्ये २५ टक्के बचत करता येते. |
| गहू | ओंब्या लागणे ते दाणे भरण्याची अवस्था | गहू पिकाच्या ज्या महत्त्वाच्या अवस्था आहेत **,** त्या वेळी पिकास पाणी देणे फायद्याचे आहे. दुसरे पाणी ४२ ते ४५ दिवसांनी (कांडी धरण्याची वेळ) आणि तिसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी (पीक ओंबीवर येण्याची वेळ) द्यावे तसेच स्थानिक परिस्थिती व जमिनीच्या खोलीनुसार पाण्याच्या दोन पाळ्यामध्ये अवशक्तेनुसार अंतर ठेवावे. गहू पिकावरील मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० % प्रवाही १० मिली किंवा इमीडयाक्लोप्रीड १७.८ एस.एल. ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| करडई | बोंडे लागणे ते पक्वता अवस्था | करडई पिकावरील मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच व्यवस्थापनासाठी मेटारेझीम अनिसोप्ली ५० ग्राम किंवा डायमेथोएट ३० % प्रवाही १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अल्टरनेरीया बुरशीमुळे होणार्याद करडईच्या पानावरील ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेनडॅझिम १२% + मॅन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून रोगाची लक्षणे दिसताच फवारणी करावी. |
| तुर | पक्वता ते काढणी अवस्था | तुरीमधील घाटे अळी /पिसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये एच .एन.पी.व्ही **(HNPV)** ५०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर ऱ्या जैविक किडनियंत्रणाचा वापर करावा. गरजेनुसार १८ .५ **%** प्रवाही क्लोरॲट्रीनिलीप्रोल १५० मिली अथवा इमामेक्टीन बेझोएट २०० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मका | दाणे भरण्याची अवस्था | मक्यावरील लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी ५ **%** निबोंळी अर्क किंवा लॅमडा सायहेलोथ्रीन ९.५ **%** झेड सी या किटकनाशकाची ५ मिली प्रति १० लिटर पाणी फवारावे. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी १५ ते २० दिवसापर्यंत करु नये. |
| कोबीवर्गीय पिके | पिक वाढीची अवस्था | कोबी पिकावरील मावा व फुलकोबीतील गड्डा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी म्यलेथिओन ५० ई. सी. २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे किंवा ४ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| मिरची | पीक वाढीची अवस्था | मिरची पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. ५ मिली किंवा फिप्रोनील ५ एस.सी. १५ मिली या किटकनाशकांच्या प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| वांगी | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे वांग्यामध्ये शेंडा आणि फळे पोखरण्या-या अळीच्या नियंत्रणासाठी ४ **%** निंबोळी अर्क किंवा सायपरमेथ्रीन २५ **%,** ५ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे. दर आठवड्याला किडलेले शेंडे आणि फळे गोळा करुन नष्ट करावीत. |
| केळी | | केळी पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी केळीचे घड ६ टक्के सच्छीद्रतेच्या पॉलीथीन पिशव्यांनी झाकावेत. मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट २० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यासारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | सर्व जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ पाणी द्यावे. जनावराच्या गोठ्यामध्ये व कुकुटपालनात (मोठे बल्प लावावेत) उबदार वातावरण राहील अशी काळजी घ्यावी. रात्रीच्या वेळी थंडी वाढत असल्याने छोटी करडे, कोकरे यांना निवारा करावा. करडांची संख्या जास्त असल्यास गोठ्यामध्ये करडांना ऊब लागेल अशा उंचीवर २०० ते ५०० वॅटचे बल्ब लावावेत. रात्री जनावरे गोठ्यात ठेवा आणि त्यांना थंडीतून बचावासाठी कोरडी उबदार जागा द्या. सकाळी गवतावर दव पडले असल्याने शक्यतो जनावरे उशिरा ऊन पडल्यानंतरच चरावयास न्यावेत. थंडीचे प्रमाण जास्त वाढत असल्यास गाई, म्हशींच्या पाठीवर अंग झाकेल असे गोणपाट बांधावे. थंड स्थितीचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी आहारात पुरेसे प्रथिने आणि खनिजे द्या. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : २८.०१.२०२२

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**